ARTHA Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २३ पुणें, बुधवार तारीख ४ डिसेंबर, १९५७ अंक ४५

## विविध माहिती

**गुन्हेगारविषयक चर्चा**—गुन्हेगारांना द्यावयाची वागणूक व गुन्हे कमी करण्याचे उपाय ह्या विषयासंबंधीं आशिआंतील देशांच्या प्रतिनिधींनीं टोकिओ येथें चर्चा चालविली आहे. हें चर्चा-मंडळ संयुक्त-राष्ट्र संघटनेतर्फे बोलाविण्यांत आलें होतें. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांत, तुरुंगांतील कैद्यांच्या श्रमाचा उपयोग करण्याबद्दलहि चर्चा करण्यांत आली.

**भारतीय इतिहासाचा दुसरा खंड**—इंडिअन हिस्टरी कॉंग्रेस व भारतीय इतिहास परिषद् ह्यांच्यातर्फे भारताच्या इतिहासाचे १२ खंड प्रकाशित करण्यांत यावयाचे आहेत. त्यापैकी २ रा खंड चालू महिन्याच्या मध्यापर्यंत प्रसिद्ध करण्यांत येणार आहे. ह्या खंडांत मौर्यांच्या राजवटीच्या अखेरपासून गुप्त साम्राज्याच्या उगमापर्यंतचा ६०० वर्षांचा इतिहास येईल.

**भारताचे अमेरिकन मित्र**—न्यूयॉर्कमधील कांहीं प्रतिष्ठित अमेरिकन नागरिकांनीं ‘ भारतमित्र ’ नांवाची एक संस्था काढण्याचें ठरविलें आहे ह्या अमेरिकन नागरिकांत विमानकंपन्या, बँका, एंजिनिअरिंग, वाहतूक, इत्यादि व्यवसायांशीं संबंध असलेली मंडळी आहेत.

**भाताच्या कोंड्यापासून खाण्याचें तेल**—भाताच्या कोंड्यापासून खाण्याचें तेल तयार करून तें बाजारपेठेंत विक्रीसाठी आणण्याचा विचार म्हैसूर सरकारचें उद्योगखातें करीत आहे. म्हैसूर येथील मध्यवर्ती अन्नसंशोधन संस्थेतर्फे अशा कारखान्याची शक्यता पुढें आली आहे. कारखान्यासाठी ५० लाख रुपये खर्च येईल. ह्या तेलाचा लोण्यासारखाहि उपयोग करतां येईल.

**रशिआची प्रगति स्वयंभू आहे**—रशिआनें अंतराळांत सोडलेल्या कृत्रिम उपग्रहावर नजर ठेवणाऱ्या अमेरिकन शास्त्रज्ञांच्या नेत्यानें असें बोलून दाखविलें कीं, उपग्रहांबाबत रशिआनें केलेली प्रगति स्वतःच्या बळावर केली आहे. त्या बाबतींत फितुरांची मदत झालेली नाहीं. रशिआंतील शास्त्रीय प्रगतीचा वेग अमेरिकेपेक्षा अधिक आहे, असेंहि ते म्हणाले.

**सरदार पटेलांचें स्मारक**—सरदार पटेल मेमोरिअल ट्रस्टनें भावनगर येथें ‘ सरदार-स्मृति ’ ह्या नांवाची एक इमारत बांधण्याचें ठरविलें आहे. सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या स्मरणाप्रीत्यर्थ बांधण्यांत येणाऱ्या ह्या भव्य इमारतीला ५ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**दक्षिण विभागाची बैठक**—भारताच्या दक्षिण विभागांतील कौन्सिलची बैठक पुढील महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत त्रिवेंद्रम येथें भरणार आहे. ह्या राज्यांतील नद्यांच्या पाण्याचा अधिक चांगला उपयोग कसा करतां येईल, ह्यासंबंधीं बैठकींत विचार करण्यांत येणार आहे.

**आस्वान येथील धरण**—इजिप्तमध्यें आस्वान येथें बांधण्यांत यावयाच्या धरणासाठी व वीजनिर्मितीच्या केंद्रासाठी १२·८ कोटी इजिप्शिअन पौंड खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. त्याशिवाय पाणीपुरवठ्याच्या कालव्यासाठी व कैरोपर्यंत विजेचे खांब घालण्यास निराळा खर्च लागेल.

**जरीच्या धंद्याबद्दल चौकशी**—जरीच्या धंद्यापुढील प्रश्नांची चौकशी करण्यासाठी भारत सरकारनें सहा जणांचें एक मंडळ नेमलें आहे. ह्या धंद्याची सध्याची आर्थिक परिस्थिति आणि त्याचा विकास ह्या दोन बाबींसंबंधीं मंडळानें मुख्यतः चौकशी करावयाची आहे. हा धंदा सुरत येथें केंद्रित झालेला आहे.

**पाकिस्तानांतील टागोरांचें घर**—पूर्व पाकिस्तानांत पद्मा नदीच्या कांठीं कविवर्य रवींद्रनाथ टागोर ह्यांचें एक दुमजली घर आहे. घर साठ वर्षांपूर्वी बांधलेलें आहे. पाकिस्ताननें हें घर पुराणवस्तु म्हणून संरक्षित केलें आहे. घरांतील फर्निचर विकण्यांत आलें होतें. परंतु त्यापैकीं निम्में परत मिळविण्यांत आलें आहे.

**वृत्तपत्राच्या कागदाचा कारखाना**—आंध्र राज्यांत जर्मन तंत्रज्ञांच्या साह्यानें वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. कच्चा माल म्हणून उसाच्या चिपाडांचा उपयोग करण्यांत येणार आहे. कारखान्यांत दरसाल ३०,००० टन कागद तयार करण्यांत येईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## रिझर्व्ह बँकेकडून मध्यवर्ती सरकारला ३० कोटी रुपये नफ्याची प्राप्ति

३० जून, १९५७ अखेर संपलेल्या वर्षी रिझर्व्ह बँकेला ३६.२० कोटी रु. उत्पन्न मिळालें. खर्च ६.२० कोटी रु. झाला. म्हणजे, मध्यवर्ती सरकारला देण्यासाठी ३० कोटी रुपये उपलब्ध झाले. गेल्या वर्षी रिझर्व्ह बँकेच्या नफ्याचे २० कोटी रुपये मध्यवर्ती सरकारला मिळाले होते.

'व्याज' ह्या सदराखालील उत्पन्न गेल्या वर्षी विशेष वाढलें. रोख्यांवरील व्याजांत झालेली वाढ आणि रुपयांतील रोख्यांतील वाढ, ही त्याला मुख्यतः कारणीभूत आहे. शेड्यूल्ड बँकांना दिलेल्या कर्जांवरील व्याजांतहि वाढ झाली. 'डिस्कौंट' ह्या सदराखालील उत्पन्न मात्र बरेंच घटलें. मध्यवर्ती सरकारच्या शिलका भरून काढण्यासाठी ट्रेझरी बिलें निर्माण केलीं गेलीं. त्यांवरील व्याज वाढलें तरी स्टर्लिंग ट्रेझरी बिलांवरील डिस्कौंट-मध्यें घट झाली; कारण लंडनमधील व्याजाचे दरहि खालीं गेले आणि एकूण स्टर्लिंग रोख्यांतहि घट झाली.

चालू वर्षाच्या नफ्यांतून ५ कोटी रुपये नॅशनल ॲग्रि. क्रेडिट (लॉंग–टर्म ऑपरेशन्स) फंडांत व १ कोटी रु. नॅशनल ॲग्रि. क्रेडिट (स्टॅबिलायझेशन) फंडांत टाकण्यांत आले. आतां ह्या फंडांतील शिल्लक रकमा अनुक्रमें २० कोटी रु. व २ कोटी रु. एवढ्या झाल्या.

अहवालाचे वर्षी खर्चांत ७५.९६ लक्ष रुपयांची वाढ झाली. नोकरांचा पगार, पैशांची वर्गावर्गी, चेक–नोटांची छपाई, ह्या खर्चांत मुख्यतः वाढ दिसून आली.

इश्यू खात्यांतील सोन्याची हिशेबांत दाखविलेली किंमत १ रुपयास ८.४७५१२ ग्रेन अशी होती, तीं ६ ऑक्टोबर, १९५६ रोजीं १ रुपयास २.८८ ग्रेन अशी करण्यांत आली. त्यामुळें, इश्यू खात्यांतील सोन्याच्या सांठ्याची किंमत ७७.७४ कोटी रुपयांनीं वाढली. त्यांपैकीं ७५ कोटी रुपये रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करण्यांत आले आणि उरलेले २.७४ कोटी रुपये मध्यवर्ती सरकारला द्यावयाच्या नफ्यांत घालण्यांत आले. रिझर्व्ह फंडांत आतां ८० कोटी रुपये आहेत.

---

**विजेवर व तेलावर चालणारीं एंजिनें**—भारतामधील रुंद रुळाच्या रेल्वेमार्गावर वापरण्यासाठी १०० रेल्वे एंजिनें अमेरिकेंतील एका कारखान्याकडून मागविण्यांत आलीं आहेत. त्यांपैकीं २० एंजिनांचा पहिला हप्ता नुकताच कलकत्ता बंदरांत आला आहे. इंजिनें, वीज व तेलावर चालणारीं आहेत. तीं आपल्याला लागणारी वीज स्वतःच निर्माण करतील.

**अहमदाबाद कॉर्पोरेशनचें कर्ज**—अहमदाबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशनला चालू आर्थिक वर्षात ६१,२५,००० रुपयांचें कर्ज उभारण्याची परवानगी मुंबई सरकारकडून मिळाली आहे. कॉर्पोरेशननें भांडवली खर्चाच्या ज्या योजना हातीं घेतल्या आहेत, त्यांचा खर्च भागविण्यासाठी कर्ज उभारण्यांत येत आहे.

**स्टेशनांना विजेचा पुरवठा**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाल्यापासून भारताच्या रेल्वे-बोर्डानें सप्टेंबर अखेरपर्यंत १९४ रेल्वे स्टेशनांना विजेचा पुरवठा केला आहे. १९६१ च्या मार्च अखेरीपर्यंत आणखी ७४० स्टेशनांना वीज पुरविली जाईल. कार्यक्रमांत ९०० स्टेशनांना वीज पुरविण्याचें ठरविण्यांत आलें आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

**शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. वा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |

**एकूण खेळतें भांडवल रु. ६५,००,०००चे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# अर्थ

बुधवार, ता. ४ डिसेंबर, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## राष्ट्रीय अर्थव्यवस्थेंत खाजगी उद्योगधंद्यांचें स्थान

उत्तर-प्रदेश राज्याचे माजी गव्हर्नर श्री. होमी मोदी ह्यांनीं मुंबई येथें एका प्रसंगीं बोलतांना ' राष्ट्रीय अर्थव्यवस्थेंत खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांचें स्थान ' ह्या विषयावर आपले विचार व्यक्त केले आहेत. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, भारताची प्रगति व्हावयाची असल्यास खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना कांहीं प्रमाणांत स्वातंत्र्य देण्यांत आलें पाहिजे. अर्थात्, नियोजित अर्थव्यवस्थेंत साचेबंदपणा व नियंत्रणें हीं अनिवार्यच आहेत हें कबूल केलें पाहिजे. पण, ह्या दोन्हीं गोष्टींचा अतिरेक झाला तर सर्वच प्रगति खुंटल्याशिवाय राहात नाहीं. ह्या बाबतींत अमेरिका आणि पश्चिम जर्मनी ह्यांचीं उदाहरणें लक्षांत घेण्यासारखीं आहेत. ह्या दोन्हीं देशांत खाजगी उद्योगधंद्यांवर कोठल्याहि प्रकारचीं नियंत्रणें नव्हतीं. तरीहि तेथील रहाणीचें मान बरेंच उच्च प्रतीचें आहे. पश्चिम जर्मनीची दुसऱ्या महायुद्धाच्या अखेर कल्पनातीत पडझड झालेली असतांनाहि, त्या देशानें आपली आर्थिक स्थिति सुधारण्यांत यश मिळविलेलें आहे. पश्चिम जर्मनीच्या सरकारनें देशांतील खाजगी मालकीच्या धंद्यांना जें संपूर्ण स्वातंत्र्य दिलें, त्यामुळेंच हें यश शक्य झालें.

भारतांतील आर्थिक प्रगतीचा प्रश्न थोडासा निराळ्या स्वरूपाचा आहे. खाजगी उद्योगधंद्यांचे चालक पुढाकार घेऊन व लवचिक धोरणें स्वीकारून प्रगति साधीत असतात. ह्या गुणांमुळें अर्थव्यवस्थेचा जो फायदा होतो त्याची आणि खाजगी उद्योगधंदे समाजाच्या हितासाठी कसें चालविले जातील, ह्याची सांगड कशी घालावी हा भारतांत मुख्य प्रश्न आहे. १९ व्या शतकांत ज्या प्रकारची अनिर्बंध अर्थव्यवस्था प्रचलित होती, तशी आतां पुन्हां अवतरणें शक्यच राहिलेलें नाहीं. आतां शासनसंस्था अथवा सरकार सर्वशक्तीमानच नव्हे तर सर्वसाक्षी झालेलें आहे. तुम्ही जेथें असाल तेथें त्याचें अस्तित्व तुम्हांला जाणवेल. कदाचित् परिस्थितींत झालेला हा बदल अनिवार्यहि असेल. पण ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, तुम्ही कोठलाहि धंदा करीत असा; सरकार त्याच्या दैनंदिन व्यवहारांत हस्तक्षेप करूं लागलें आहे. असें असतां कामा नये. प्रत्येक अवस्थेंत सरकारचा हस्तक्षेप होण्याची भीति न रहातां आर्थिक व्यवहार योग्य तितक्या स्वातंत्र्यानें होऊं देणें जरूर आहे. खाजगी उद्योगधंदे म्हटलें कीं, ह्या भागांतील संघटित उद्योगधंदेच तेवढे डोळ्यापुढें उभे राहतात. खरें म्हणजे ह्या भागांत शेती, निरनिराळ्या प्रकारचे व्यवसाय, ह्यांचा आणि इतर असंघटित उद्योगधंद्यांचाहि समावेश होतो. तथापि, देशांत सध्यां जो वाद चालला आहे त्याच्या अनुषंगानें खाजगी उद्योगधंदे म्हणजे संघटित खाजगी उद्योगधंदे असा अर्थ होऊन बसला आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा इतिहास म्हणजे खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांच्या वाढीचाच इतिहास आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांच्या मर्यादा सरकारनें लक्षांत घेणें जरूर आहे. खाजगी उद्योगधंद्यांच्या मालकांमध्यें दोष नाहींत असें नाहीं. त्यांच्यापैकीं कांहींनीं आपलें काम नीट केलेलें नाहीं हें खरें. पण तरीसुद्धां त्यांनीं केलेल्या कामगिरीचें श्रेय त्यांना दिलें पाहिजे.

---

## अमेरिकेंत सीलोनचा चहा अधिक खपूं लागला

भारताला परदेशीय हुंडणावळ मिळवून देणाऱ्या निर्यातीच्या पदार्थांत चहा हा एक महत्त्वाचा पदार्थ आहे. पण चहाच्या निर्यात बाजारपेठेंत भारताला आतां स्पर्धेला तोंड द्यावें लागत आहे. अमेरिकेंतील लोक अधिक प्रमाणांत चहा पिऊं लागले आहेत. पण त्याचा फायदा मिळून भारताची चहाची निर्यात अधिक होण्याऐवजीं घटूं लागली आहे. गेल्या दोन वर्षांत ही घट खूपच झपाट्यानें झाली असून भारताच्या चहाची जागा सीलोनमधील चहा अधिकाधिक प्रमाणांत घेऊं लागला आहे. गेल्या वर्षी अमेरिकेनें भारताकडून अवघा ३·२ कोटी पौंड चहा आयात केला. गेल्या दोन वर्षांत भारताची चहाची निर्यात ९० लाख पौंडांनीं कमी झाली आहे. चालू वर्षींहि ही घसरगुंडी अशीच चालू आहे. १९५६ सालीं भारतानें चहाची निर्यात करून अवघे १·६९ कोटी डॉलर्स मिळविले. मागील सालापेक्षा ही प्राप्ति ८० लाख डॉलर्सनीं कमी आहे. न्यूयॉर्कमधील भारताचे अधिकारी ह्या बाबतींत पुढीलप्रमाणें कारणें सांगत आहेत. सीलोन आपला चहा भारतापेक्षा दर पौंडामागें ५ सेंटस कमी भावानें विकत आहे आणि चहाचे अधिक प्रकारहि देत आहे. अमेरिकन व्यापारी जो मध्यम प्रतीचा चहा आयात करतात, तो भारतांत पुरेसा मिळत नाहीं. सीलोन तो भरपूर प्रमाणांत देऊं शकतो. शिवाय, सीलोनचा चहा भारतामधील चहापेक्षा टिकण्याच्या दृष्टीनें अधिक चांगला आहे. आयात झाल्यापासून ६ महिन्यानंतर तो प्रत्यक्ष गिऱ्हाइकापर्यंत पोंचतो. ह्या कालाच्या दृष्टीनें सीलोनचा चहा टिकाऊ आहे असें म्हणतात. भारताच्या चहावर घेण्यांत येणारी निर्यात जकात अनिश्चित असल्यामुळें वायदेबाजारांतील अमेरिकन व्यापारी सीलोनच्या चहाचे जास्त सौदे करूं लागले आहेत.

---

## दि बेलापूर कंपनी लि.

३० सप्टेंबर, १९५७ अखेर संपलेल्या वर्षी बेलापूर कंपनीनें साखर विकून १ कोटि, ४६ लक्ष रुपये मिळविले. ४७ लक्ष रुपयांची साखर शिल्लक होती.

२ लक्ष, ६० हजार रुपये घसारा काढून व २० लक्ष रुपयांची करासाठीं तरतूद करून ४८ लक्ष रुपये नफा उरला. त्यांतून भागीदारांना दर भागावर १८ रु. करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे. जनरल रिझर्व्हकडे १० लक्ष रु. आणि हाउसिंग रिझर्व्हकडे १० लक्ष रु. वर्ग केले जातील.

कंपनीचें वसूल भांडवल ७०½ लक्ष रुपये असून तिचेजवळ वेगवेगळ्या रिझर्व्हजूमध्यें १ कोटि, २७ लक्ष रुपये आहेत. कंपनीनें रोख्यांत २३ लक्ष रुपये गुंतवलेले असून, ८७ लक्ष रु. बँकांत मुदती ठेवींत व रोख आहेत.

गेल्या वर्षी कंपनीनें साखरेच्या उत्पादनांत व नफ्यांत उच्चांक गाठला. बाहेरचा फारच थोडा ऊंस कंपनीनें खरेदी केला.

## गाडगीळांच्या सराफी पेढीचा १२५ वा वाढदिवस

व्यापारी पेढीला शताब्दिमहोत्सव साजरा करण्याची संधि दुर्मीळ असते. त्यांतून महाराष्ट्राला व्यापारी परंपरा नसल्यानें हा योग फारच क्वचित् लाभतो. सांगली भागांतील प्रमुख सराफ व जव्हेरी पुरुषोत्तम नारायण गाडगीळ ह्या पेढीला त्याहूनहि महत्त्वाचा असा १२५ वा वाढदिवस साजरा करण्याचा मान दि. २८।११।५७ रोजीं (मार्गशीर्ष शु. ७) लाभला आहे. आज गाडगीळांच्या दुकानांत पांचवी पिढी कर्तेपणानें काम पहात आहे व सहाव्या पिढीनें उमेदवारीला प्रारंभ केला आहे. एकामागून एक चांगलीं माणसें घराण्यांत जन्मणें ही परमेश्वराची कृपा आहे आणि ती या घराण्याला सतत लाभली आहे गाडगीळ घराण्याचें या शुभप्रसंगीं अभिनंदन करण्याबरोबर परमेश्वरालाहि धन्यवाद दिले पाहिजेत.

### धंद्याला कवडीपासून प्रारंभ

सुमारें १२५ वर्षांपूर्वी श्री. नारायण वासुदेव गाडगीळ कोंकणांतून देशावर आले. त्यावेळीं कवडी हें चलनी नाणें होतें व त्याचें रूपांतर पैशाअडक्यांत करणें हा त्याकाळचा अल्प भांडवली धंदा होता. तोच त्यांनीं सांगली येथें सुरू केला. त्यांचें सुपुत्र श्री.गणेश नारायण गाडगीळ यांनीं एक लहानसें सराफी दुकान काढलें. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ, सराफ व जव्हेरी, म्हणून आज प्रसिद्ध असलेली पेढी हें त्याचें वाढतें स्वरूप होय. यानंतरच्या पिढींत श्री. नारायण गणेश गाडगीळ यांनीं दुकानाचा चांगला जम बसविला. नव्या पिढीनें मागच्या पिढीच्या हाताखालीं दुकानांत काम करीत व्यवसायाचें शिक्षण घ्यावयाचें अशी आजतागायत गाडगीळांची परंपरा आहे. त्याप्रमाणें श्री. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ यांनीं वडिलांच्या हाताखालीं उमेदवारीचीं कांहीं वर्षे काढल्यावर त्यांच्या बरोबरीनें दुकानचा कारभार पाहिला. ते अव्वल दर्जाचे रत्नपारखी होते. त्यामुळें आपल्या जिनसाची खरेदी-विक्री त्यांच्या हातून व्हावी अशी गिऱ्हाईकांची इच्छा असे.

श्री. पुरुषोत्तम नारायण गाडगीळ यांना त्यांचे बंधु कै. गणेश नारायण ऊर्फ दादासाहेब व श्री. वासुदेव नारायण ऊर्फ बापूराव यांचें मोठें साहाय्य असे. यांपैकीं दादासाहेबांनीं पुढें शेतीच्या व्यवसायांत लक्ष घातलें. दुसरे बंधु श्री. बापूराव यांनीं दुकानच्या व्यवहारापैकीं मुंबईकडील खरेदी-विक्रीची जबाबदारी पत्करली व ती उत्तम रीतीनें पार पाडली. यामुळें धंद्याचा व्याप पुष्कळच वाढला. 'गाडगीळांकडील माल म्हणजे नंबरी माल' अशी या भागांत सर्वत्र ख्याति आहे. त्यांच्या दुकानीं समाजांतील सर्व थरांतील गिऱ्हाईक दिसून येतें. सांगलीच्या आसपासच्या सुमारें तीनशें गांवांतील गिऱ्हाईक गाडगीळांकडे आहे.

### हुंडीचा व्यवहार

आसपासच्या संस्थानिकांचें गिऱ्हाईक तर गाडगीळांकडे आहेच, पण सांगली संस्थाननें याहूनहि जोखमीची कामगिरी त्यांच्यावर सोंपविली होती. कै. धुंडीराज तात्यासाहेब सांगलीकर यांच्या कारकीर्दीत तालुक्यांतील खजिन्यांतील मोठमोठ्या रकमांची ने-आण गाडगीळांमार्फत चाले. यामुळें गाडगीळांच्या पेढीचा हुंडीचा व्यवहार जोरानें सुरू झाला. ह्यामुळें गाडगीळांची हुंडी काशीपासून रामेश्वरापर्यंत चालूं लागली. सांगलीहून मुंबईस हुंड्या देण्याचें काम आज अनेक बँकांमार्फत चालतें. एकवेळ हें सर्व काम गाडगीळांच्या एकाच दुकानामार्फत चालत असे! संस्थानलाहि गाडगीळांचा मोठा आधार वाटे. पुढें बँकेचें युग सुरू झाल्यावर सांगली बँकेची स्थापना कै. पुरुषोत्तम नारायण ऊर्फ आबासाहेबांच्या हस्तें करून त्यांच्या सेवेचा येथील व्यापाऱ्यांनीं एकपरी मोठा गौरव केला.

### वैशिष्ट्यपूर्ण परंपरा

उमेदवारीच्या दिवसांत दुकानासाठीं अंग मोडून राबावयाचें व नवी पिढी शिकून तयार होतांच आपण सेवानिवृत्त व्हावयाचें, ही गाडगीळ घराण्याची वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. ही जुनी मंडळी वर्षांतून दुकानांत एकदांच पहावयाला मिळावयाची; ती म्हणजे दिवाळींत लक्ष्मीपूजनाच्या वेळीं, आपल्या जुन्या-नव्या आश्रयदात्यांच्या स्वागतप्रसंगीं.

आज या पेढीचा व्याप श्री. शंकर गणेश ऊर्फ आप्पासाहेब व श्री. लक्ष्मण वासुदेव गाडगीळ हे सांभाळत आहेत व त्यांच्या धाकट्या बंधूंचें, श्री. दाजीसाहेब, श्री. त्रिंबुभाऊ, श्री. हरीभाऊ यांचें, त्यांना साहाय्य होत आहे. सहाव्या पिढीची दुकानांतील उमेदवारी श्री. आप्पासाहेबांचे चिरंजीव श्री. बाबूराव यांच्याकडून गेल्या तीन वर्षांपासून सुरू झाली आहे. आज सव्वाशें वर्षांच्या वाढदिवसाच्या शुभप्रसंगानिमित्त पुणें येथें आपल्या पेढीची शाखा स्थापन करण्याचा त्यांनीं संकल्प केला असून, लक्ष्मीरोडवर कुंटेचौकांत त्यासाठीं जागाहि मिळविली आहे. या पेढीच्या अशाच ठिकठिकाणीं शाखा निघोत व तिची भरभराट होवो अशी या शुभप्रसंगीं आमची प्रार्थना आहे.

—विजय, २७-११-१९५७.

---

**Dr. Mrs. Kashibai Awsare** Santacruz
M. B., B. S. १२-११-५७

सकृद्दर्शनीं क्षुल्लक दिसणाऱ्या गोष्टींचें संकलन करून, त्याविषयीं लेखकानें अत्यंत मार्मिक असें विवेचन केलें आहे.

"अपकारक शालीनता" अथवा "आपण सहल काढूंया" हे निबंधात्मक लेख साहित्याच्या दृष्टीनेंहि सुंदर वठले आहेत.

"लष्करी अधिकाऱ्याची सहचारिणी," "मधुचंद्र" ह्यासारख्या निबंधांत व्यक्तींच्या मानसिक अवस्थांचें विवेचन लेखकाची मूलगामी निरीक्षण-शक्ति दाखविते.

खरें म्हणावयाचें, तर पुस्तकांतील सर्वच निबंध चांगले वठले आहेत. मोत्यांच्या सरांत त्यांतल्या त्यांत पाणीदार मोतीं कोणते, एवढेंच शोधावयाचें आहे.

सौ. काशीबाई अवसरे

---

तुमचें स्थान कोणतें ? पृ. सं. १२०, किं. २ रु. टपाल खर्च १५ नये पैसे

"कण आणि क्षण" चें गुजराती भाषांतर
સુખી જીવનની પગદંડી
दुसरी आवृत्ति. ] [ १ रु. ८ आ.

"पुढे पाऊल" चें गुजराती भाषांतर
સદાચારને પગલે
छापत आहे

## भारतामधील निर्यात व्यापाऱ्यांना इषारा

भारताच्या सरकारनें नेमलेल्या निर्यात व्यापार सल्लागार कमिटीची पहिली बैठक कलकत्ता येथें भरली होती. बैठकीचें उद्घाटन व्यापार व उद्योगखात्याचे जॉइंट सेक्रेटरी, श्री. लाल ह्यांनीं केलें. त्याप्रसंगीं भाषण करतांना श्री. लाल म्हणाले कीं, जगांतील औद्योगिक क्रांतीचें युग जवळजवळ संपत आलेलें आहे. ह्यापुढची क्रांति शास्त्रीय स्वरूपाची राहणार असून तिच्यामुळें उत्पादनाच्या तंत्रांतच क्रांति होणार आहे. त्यामुळें येत्या १० वर्षांच्या काळांत भारताच्या परदेशीय व्यापारावर फार मोठा परिणाम होणार आहे. म्हणून व्यापाऱ्यांनीं मागणींत जगभर फरक पडत जात आहेत अगर जाणार आहेत त्यांची नीट दखल घेतली पाहिजे आणि ह्या बदलाचा फायदा घेतला पाहिजे. आतांपर्यंत भारतामधून ज्या मालाची निर्यात करण्यांत येत आहे त्या मालाला भविष्यकाळीं मागणी राहीलच असें सांगतां येणार नाहीं. परदेशीय हुंडणावळीची जी समस्या उत्पन्न झाली आहे, ती सोडवावयाची असल्यास सध्यां निर्यात होणाऱ्या जिनसांची निर्यात तर अधिक प्रमाणांत केलीच पाहिजे; पण ह्या परंपरागत जिनसांच्या यादीबाहेरील जिनसांहि निर्यात करण्यास प्रारंभ केला पाहिजे; निर्यातीच्या बाजारपेठा वाढविण्यासाठी अधिक आस्थापूर्वक प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. मग त्यामुळें तात्पुरतें नुकसान झालें, तरी हरकत नाहीं. सध्यां भारताला दरसाल सुमारें ६०० कोटी रुपयांची परदेशी हुंडणावळ निर्यात व्यापारांत मिळते. पण हुंडणावळीच्या ह्या मिळकतींत २०० कोटी रुपयांची भर घालणें आवश्यक आहे. ती घातली नाहीं, तर भारतामधील कितीतरी विकासाच्या योजना स्थगित कराव्या लागतील.

## आर्थिक मदत देण्यासंबंधीं कसोट्या

डॉ. लिऑन केसर्लिंग हे प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ भारताच्या आर्थिक परिस्थितीची व विकासकार्याची पहाणी करण्यासाठी आले होते. १९३० सालीं अमेरिका मंदीच्या वावटळींत सांपडली असतां प्रे. रूझवेल्ट ह्यांनीं जें नवें आर्थिक धोरण स्वीकारलें, त्याची घडण करण्यांत डॉ. केसर्लिंग ह्यांचा हात होता. त्यामुळें व्यवहारकुशल अर्थशास्त्रज्ञ म्हणूनहि त्यांची ख्याति आहे. दिल्ली येथें खासदारांच्या एका सभेंत त्यांनीं भारताच्या आर्थिक परिस्थितीविषयीं आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, भारताचे पंचवार्षिक कार्यक्रम आंवाक्याबाहेरचे आहेत असा आक्रोश भारतामधील व परदेशांतील कांहीं लोक करीत असतात. पण मला त्यांचें हें म्हणणें पटत नाहीं. किरकोळ बाबतींत कार्यक्रमांत फरक करावा लागणें शक्य आहे. पण साकल्यानें विचार करतां, आर्थिक विकासासाठी भारत जें कार्य करीत आहे तें त्याच्या गरजेच्या मानानें फारच कमी आहे. तथापि, हें कार्य भारताच्या भौतिक व मानवी संपत्तीच्या आंवाक्यांतलें आहे; पैशासंबंधीं अडचणी असल्या तरी समतोल पद्धतीनें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न खात्रीनें यशस्वी होतील. जगांतील अपुऱ्या विकास झालेल्या देशांत भांडवल गुंतविण्यासंबंधीं अमेरिकेंतील कसोट्या आतां सुधारत आहेत. दिलेली मदत लोकांचे रहाणीचें मान वाढविण्यासाठी वापरली जात आहे कीं नाहीं, देशाचें आर्थिक धोरण योग्य आहे कीं नाहीं, दुसऱ्या देशांशीं वागतांना मदत घेणारा देश स्नेहाची व न्यायाची भावना ठेवतो कीं नाहीं, आणि मानवी स्वातंत्र्याचें रक्षण करण्याची त्याची तयारी आहे कीं नाहीं, ह्या त्या कसोट्या आहेत. ह्या कसोट्यांना भारत चांगलाच उतरला आहे. म्हणून भारत व अमेरिका ह्या दोन देशांत अधिक आर्थिक सहकार्य झालें पाहिजे.

## खाजगी अमेरिकन भांडवल मिळण्याची शक्यता

भारताचे अमेरिकेमधील वकील, श्री. गगनविहारी मेहता, ह्यांनीं खाजगी अमेरिकन भांडवल भारतांत गुंतविलें जाण्याची कितपत शक्यता आहे ह्यासंबंधीं कांहीं माहिती सांगितली आहे. कलकत्ता येथें बंगाल नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संस्थेनें त्यांचें स्वागत केलें. त्याप्रसंगीं व इतर एकदोन ठिकाणीं बोलतांना श्री. मेहता म्हणाले कीं, अमेरिकेंतील खाजगी भांडवलदार भारताच्या औद्योगिक विकासाकडे नीट लक्ष देत आहेत. भारतामधील भांडवलदारांबरोबर सहकार्य करून ह्या विकासांत भाग घेण्याची आस्था त्यांना वाटत आहे. मात्र, सहकार्यासाठी उभयतांनां फायदेशीर अशा अटी ठरल्या पाहिजेत, असा त्यांचा आग्रह आहे. भारताच्या एकूण परदेशीय व्यापारापैकीं १६ टक्के व्यापार अमेरिकेशीं चालतो. गेल्या दहा वर्षांत भारत आणि अमेरिका ह्यांच्यांतील सहकार्याची भूमिका बरीच विस्तृत झालेली आहे. विशिष्ट राजकीय प्रश्नांवर मतभेद असूनहि हें सहकार्य वाढलेलें आहे. भारतामधील अमेरिकेच्या भांडवलांत चौपट वाढ झालेली आहे. सध्यां भारतांत गुंतविण्यांत आलेलें अमेरिकन भांडवल ११ कोटी डॉलर्सच्या आसपास असावें. अमेरिकेंतील लोकांना भारतानें केलेल्या मोठ्या प्रगतीची जाणीव आहे. त्याचप्रमाणें भारताच्या मार्गांतील अडचणींबद्दल त्यांना सहानुभूतीहि वाटत आहे. जागतिक बँकेनें टाटा कंपनीला दिलेलें कर्ज अशा प्रकारच्या सहानुभूतीचेंच द्योतक आहे. अमेरिकेंतील खाजगी मालकीच्या बँकांनीं हें कर्ज देण्याच्या कामीं बरीच आस्था दाखविली. भारताच्या चहाची व तागाची अमेरिकेला जरूर असल्यानें ह्या पदार्थांची निर्यात संबंधितांनीं वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

**दिल्ली ते कन्याकुमारी रस्ता**—दिल्लीपासून कन्याकुमारीपर्यंत जाण्याचा रस्ता पूर्ण करण्याची योजना भारत सरकारनें आखली आहे. सध्या हा रस्ता एकसारखा सलग नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत असा रस्ता बहुधा पूर्ण करण्यांत येईल. ह्या कामासाठी ४० लाख रुपये लागतील असा अंदाज आहे. कांहीं ठिकाणीं कामास प्रारंभ झाला आहे.

**पूर्व पाकिस्तानांत बोटींचा कारखाना**—पूर्व पाकिस्तानचे मुख्य प्रधान श्री. अताऊर रहमानखां ह्यांनीं खुलना येथें बोटी बांधण्याच्या एका कारखान्याचें उद्घाटन केलें. हा कारखाना पाकिस्तान इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनतर्फे बांधण्यांत आला आहे. छोट्या बोटी बांधणें व त्यांची दुरुस्ती करणें, हीं कामें कारखान्यांत होतील.

**निष्कलंक पोलादाची निर्मिती**—जमशेटपूर येथील धातुविषयक संशोधन केंद्रांत निष्कलंक पोलाद निर्माण करण्याची अगदीं नवी पद्धत शोधून काढण्यांत आली आहे. सध्यां वापरांत असलेल्या पद्धतींत शिसें वापरावें लागत असल्यामुळें पोलादाची किंमत वाढते. नव्या पद्धतींत मँगेनीझ वापरण्यांत येणार असल्यामुळें पोलादाची किंमत कमी होईल.

**दुसऱ्या वर्गाची जागा**—लांबवर प्रवास करणाऱ्यांच्या सोयीसाठी सध्या दुसऱ्या वर्गाच्या जागेची व्यवस्था आहे. तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांसाठी झोपून जाण्याची पुरेशी व्यवस्था करण्यांत आल्यावरच लांबवर प्रवासाचा दुसरा वर्ग रद्द करण्यांत येईल, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली.

## सोन्याची भारतांतील चोरटी आयात
## (२)

गेल्या कांहीं दिवसांत चोरट्या सोन्याची आयात वाढण्यास आणखी कांहीं कारणें घडलीं आहेत. १९५४-५५ सालीं भारतांत सोन्याची अंतर्गत किंमत दर तोळ्यास सरासरी ९९ रुपये होती. १९५६-५८ सालांत किंमतींत १७·२ टक्क्यांनीं वाढ होऊन ती तोळ्याला सरासरी १०५ रुपये झाली. त्यामुळें आयात सोन्यावरील नफ्याचें प्रमाण वाढलें आहे. त्यानंतर किंमत ३·३ टक्क्यांनीं पुन्हां वाढली व १०८ रुपये झाली. ह्याच काळांत पंचवार्षिक कार्यक्रमांत बाजवींपेक्षा अधिक पैसा गुंतविला गेला. त्याचा परिणाम म्हणून धान्याच्या किंमती ५० टक्क्यांनीं वाढल्या आणि औद्योगिक कच्च्या मालाच्या किंमती सुमारें ३५ टक्क्यांनीं वाढल्या. तुलनेनें सोन्याची किंमत इतकी वाढली नाहीं. त्यामुळें शेतीच्या उत्पादनांत वाढ न होताहि पूर्वी इतक्याच उत्पादनाच्या साह्यानें पूर्वीपेक्षा अधिक सोन्याचा सांठा करणें शक्य झालें. भारताच्या चलनाचें इतर देशांच्या (उदाहरणार्थ, ग्रेटब्रिटन, बेल्जम व प. जर्मनी) चलनांत रूपांतर होणें जसजसें सोपें होत गेलें, तसतशी त्या देशांतील सोन्याची किंमत समपातळीवर येऊं लागली. गेल्या अंदाजपत्रकांतील करांच्या सूचना जाहीर झाल्यावर शेअर बाजारांत मंदी आली आणि त्याचबरोबर सोन्याचांदीच्या बाजारांत अधिक उलाढाली होऊं लागल्या. ह्याचा अर्थ, सोन्यांत अधिक पैसा गुंतविला जाऊं लागला असा असण्याचा संभव आहे. आणखी असें कीं, परदेशीय हुंडणावळीची सध्यांची टंचाई आणि रुपयाच्या अवमूल्यनाचें भय ह्यांच्यामुळेंहि सोन्याच्या आयातीला अधिक जोर आला. कारण, रुपयाच्या अवमूल्यनामुळें सोन्याच्या व्यापारांतील नफ्याचें प्रमाण कमी होण्याची शक्यता होती. आयात मालाच्या बंदरांतील किंमती आणि त्याच्या बाजारांतील किंमती ह्यांच्यांत जशी खूप तफावत असते तशीच ही तफावत होती. परदेशीय चलनांतील किंमतींचे रुपयांतील किंमतींत परावर्तन करण्यासाठी जो कृत्रिम हुंडणावळीचा दर वापरला त्याचाच हा परिणाम होता. ही किंमतींतील तफावत भरून काढण्याचा एकच मार्ग आहे. मागील चलनवृद्धीमुळें रुपयाच्या मूल्यांत जी भलती वाढ झालेली होती ती कमी करण्यासाठी रुपयाचें योग्य प्रमाणांत अवमूल्यन करणें आणि पंचवार्षिक कार्यक्रमासाठी गुंतविण्यांत येणाऱ्या पैशानें अधिक चलनवृद्धि होऊं न देणें. किंवा हुंडणावळीचा दर रुपयाच्या अंगभूत किंमतीवर अवलंबून ठेवून कमीअधिक होण्यास मोकळा ठेवणें. तथापि रुपयाचें अवमूल्यन आणि चलनवृद्धि टाळणें ह्या उपायांनीं सोन्याचा साठा करण्याची प्रवृत्ति थांबेलच असें नाहीं. रुपयाच्या स्थैर्याबद्दल असलेल्या शंकेमुळें सोन्याला सौदेबाजी पद्धतीची मागणी होती. रुपयाच्या चलनाला व परदेशीय हुंडणावळीला स्थिरता प्राप्त झाली तर अशी मागणी बंद होणें शक्य आहे. पण पैसा गुंतविण्याच्या लोकांच्या परंपरागत पद्धती जर बदलण्यांत आल्या नाहींत तर बचत करण्यासाठी सोन्याची मागणी चालूच राहण्याचा संभव आहे. किंमतींतील फरक जर नाहींसा करण्यांत आला तर सोन्याच्या आयातीवरील बंदी यशस्वी होणें शक्य होईल. ग्रामीण भागांतील लोकांना सोन्यांत पैसे गुंतविण्याऐवजीं इतर किफायतशीर मार्ग उपलब्ध करून देण्यांत आले तर त्यांचें सोन्याविषयींचें आकर्षण कमी होण्याचा संभव आहे. चलनाची व हुंडणावळीची स्थिरता प्राप्त झाल्यास देण्या-घेण्यांत समतोलपणा निर्माण होईल आणि बचत गुंतविण्यासाठी सोन्याची जी मागणी करण्यांत येते ती पुरविली जाईल. त्यामुळें देण्याघेण्याच्या व्यवहारावर ताणहि पडणार नाहीं. युद्धोत्तर काळांत हा अनुभव सिद्ध झालेला आहे. पण अवमूल्यन झालेलें नाहीं तोंपर्यंत सोन्याची देशांतील मागणी भागविण्यासाठी सरकारच्या सोन्याच्या आयातीच्या व विक्रीच्या धोरणाचा परिणाम काय होईल तें पहाण्यासारखें आहे. दरसाल ३३ लाख तोळे सोन्याला मागणी आहे असें समजलें तर सध्यांच्या १०८ रुपये तोळ्याच्या भावानें सरकारला सुमारें १५ कोटी रुपये मिळवितां येतील आणि त्यासाठी २१ कोटी रुपयांचें भांडवल गुंतवावें लागेल. ही पंधरा कोटी रुपयांची रक्कम आज सोन्याची चोरटी आयात करणारे व त्यांचे साथीदार ह्यांच्या हातीं पडत आहे. सोन्यासाठी जरूर तितक्या परदेशीय हुंडणावळीचा बदला एवींतेवीं करण्यांत येतच आहे. तेव्हां सरकारनेंच सोन्याची विक्री केल्यास परदेशीय हुंडणावळीवर अधिक ताण पडणार आहे, अशांतला भाग नाहीं. युद्धकाळांत दोस्त राष्ट्रांनीं केलेल्या सोन्याच्या विक्रीचा दाखला आहेच. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा सभासद ह्या नात्यानें भारतावर जीं बंधनें आहेत त्यांच्याशीं विरोध उत्पन्न होणार नाहीं, अशा रीतीनें ज्या देशांत सोनें युक्त दरांत मिळेल त्या दरानें विकत घेऊन भारतांत तें विकणें भारत सरकारला सहज शक्य होईल.

---

## सन्मित्र को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लिमिटेड, मुंबई.

कार्याध्यक्ष : शंकर नारायण कानडे, एम्. ए.

मॅनेजिंग डायरेक्टर : शंकर विष्णु जोशी.

वर्षअखेर सभासद पटावर 'अ' वर्गाचे १२९० सभासद असून जमा झालेलें भांडवल रु. १,१७,३१९ आहे. गतवर्षी या संख्या अनुक्रमें १,२५१ व रु. १,१६,५६० अशा होत्या. वर्षारंभींच्या रु. ४,५९,४९२-७-६ च्या ठेवींत भर पडून वर्षअखेर एकंदर सर्व प्रकारच्या ठेवींची रक्कम रु. ४,९६,८८८·३५ इतकी आहे.

अहवालसालीं ३८० अर्जे रु. १,२४,२९४ एवढ्या रकमेच्या कर्जमागणीसाठी आले. त्यांपैकीं ३७७ अर्जदारांना रु. १,१८,०८९ चें कर्ज मंजूर करण्यांत आलें. ३६८ अर्जदारांना रु. १,१४,९१४ चें कर्ज देण्यांत आलें.

अहवालसालीं एकंदर ९ सभासदांकडून रु. २५,५०० चें कॅश क्रेडिट् मिळण्यासाठीं अर्ज आले. त्यांची तपासणी होऊन ८ अर्जदारांना एकंदर रु. २३,५०० चें कॅश क्रेडिट मंजूर करण्यांत आलें. एकंदर येणें कर्जाशीं थकबाकीचें शेंकडा प्रमाण ६·७४ टक्के आहे.

वर्षअखेर सभासदांकडून एकूण येणें २,५२,३८७ रु. आहे. बँकेनें सरकारी कर्जरोखे, अधिकृत रोखे व शेअर्स यांमध्यें एकूण रु. ३,१६,१८२·०९ गुंतविले आहेत. त्यांची ३० जून, १९५७ अखेर त्यावेळच्या बाजारभावाप्रमाणें किंमत रु. ३,१०,४५४·१५ आहे. याशिवाय रु. १५,०००दर्शनी किंमतीचीं नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटस् आहेत.

अहवालसाठीं बँकेनें ठेवलेल्या ऋण साहित्याचा २५ सभासदांनीं फायदा घेतला.

अहवालसालीं झालेला खर्च वजा जातां निव्वळ नफा रुपये १२,१२३·३१ राहतो.

गेलीं सात वर्षे बँकेला 'अ' वर्ग मिळत आलेला आहे. या वर्षीहि बँकेची स्थिति प्रगतिपर असल्याकारणानें पूर्वी मिळालेला 'अ' वर्ग चालू राहिला आहे.

## गेल्या शंभर वर्षांतील बेळगांवांतील बँकिंगचा आढावा (१८५७ ते १९५७)

( ले.—श्री. जी. डी. सराफ, चेअरमन, धी बँक ऑफ सिटिझन्स लि., बेळगांव. )

१८५७ सालापासून असलेल्या हिंदुस्थानांत इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर पाश्चिमात्य सुधारणांचें पीक प्रत्येक क्षेत्रांत दिसूं लागलें. नवीन कायदे तयार झाले. व प्रत्येक शहराला स्थानिक स्वराज्य संस्थांचा कायदा लागू झाला. नागरिक जीवन सुधारण्याकरितां स्थानिक लोकांनीं जास्तींत जास्त भाग घ्यावा या उद्देशानें हा कायदा अमलांत आला. आमची बेळगांवची स्थानिक स्वराज्य संस्थाहि ह्याच सुमारास जन्मास आली व आज आपण तिची शताब्दि साजरी करीत आहोंत. ही शताब्दि साजरी करतांना सर्व क्षेत्रांतील प्रगतीचा आढावा घेणारा ग्रंथनिर्मितीचें कार्य स्थानिक स्वराज्य संस्थेनें हातीं घेतलेलें पाहून फार आनंद वाटला.

आतां ह्या शंभर वर्षांत पहिलीं पन्नास वर्षे इंग्रजांनीं आपली राजकीय पकड बळकट करणेंत घालविलीं व पुढच्या पन्नास वर्षांत आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांत सुधारणा करण्याकरितां नवीन कायदे करण्यांत आले. म्हणजे कंपनी कायदा, बँकिंग कायदा, रिझर्व्ह बँकची स्थापना, सहकारी कायदा, वगैरे हे सर्व कायदे १९०० सालानंतरचे आहेत व आतांच कुठें बेळगांवांत १९०६ सालीं स्थापन झालेली सहकारी बँकेची ५० वी व जिल्ह्यांतील मध्यवर्ती सहकारी बँकेची रौप्य ज्युबिली व जॉईंट स्टॉक बँकेच्या कायद्यानुसार स्थापन झालेल्या बँकेची २५ वी साजरी करण्यांत आली आहे. तेव्हां आर्थिक क्षेत्रामध्यें बँकिंग, इन्शुरन्स, वगैरे बाबतींत आम्हीं कुठें या पन्नास वर्षांतच पाश्चिमात्यानुकरण सुरू केलें आहे.

यापूर्वींहि आमचेकडे बँकिंग होतें. परंतु नियमित भांडवलाच्या कंपनीची कल्पना मात्र आम्हीं पाश्चामात्यांकडूनच उचललेली आहे, हें कबूल केलें पाहिजे. आमच्याकडे भागिदारी पद्धति होती. परंतु पांच, दहा, शंभर रुपये, अशा भागांचे हजारोंनीं भागीदार होऊन ठराविक रकमेपर्यंतच जबाबदार होणाऱ्या मोठ्या कंपन्या फक्त पाश्चात्यांनींच सुरू केल्या व आम्हींहि आज मितीस त्यामध्यें मागें नाहीं हें खरें असलें तरी त्या कल्पनेचा जन्म पाश्चात्य देशांत झाला आहे हें कबूल करावें लागेल. आज जॉईंट स्टॉक कंपन्या हिंदुस्थानांत हजारोंनीं असून त्या कंपन्याहि फायदेशीर व व्यवस्थित रीतीनें चालविल्या जात आहेत.

पूर्वीच्या काळीं बँकिंग क्षेत्रामध्यें फक्त व्यक्तिगत सावकारी चालविणारा एक वर्ग होता. तो वर्ग अडलेल्यावेळीं शेतकऱ्यास व व्यापाऱ्यास मदत करीत असे. बहुतेक खेडेगांवांत सावकारी, व्यापारी, दलाली, किराणी दुकान व कपड्यांचें दुकान वगैरे सर्व व्यवहार एखाद-दुसरीच व्यक्ति करीत असे. त्यामुळें पूर्वी पैसा फार महाग मिळत असे व सर्वसाधारण मनुष्याला पैसा मिळणें फारच कठीण होतें. सर्व व्यवस्थित असून सुद्धां पैसा व्याजी देणें म्हणजे मोठा उपकार करणें असें हे लोक समजत असत, व हे सावकार अगर नगरशेठच सर्व क्षेत्रांमध्यें पुढें असत. कुठल्याहि नियमाला अपवाद हे असावयाचेच, त्याप्रमाणें वैयक्तिक कांहीं सावकारांकडून राष्ट्र-उभारणीचे अगर समाज-उभारणीचे कामीं फार मोठ्या प्रमाणांत मदत झाली असेल; नाहीं असें नाहीं. परंतु आधुनिक बँकांच्या व त्यांच्या कामगिरीची तुलना ह्या सावकारां-बरोबर करतांच येणार नाहीं. सावकार ते सावकार व बँका त्या बँका. सावकारांना प्रत्येक व्यक्तीची खडानखडा माहिती असलेनें पतीवर उसनें दिलेले पैसे त्यांच्याकडून परत मिळतील कीं नाहीं हें तो चटकन सांगूं शकत असे. परंतु जॉईंट स्टॉक बँकेचा मॅनेजर हा एक मोठ्या बँकेचा मॅनेजर असल्यानें त्यासहि माहिती अचूक असूं शकत नाहीं; तोच स्थानिक युनिटरी बँकेचा मॅनेजर असलेस त्यास ही माहिती असूं शकते. असा हा स्थानिक बँक व त्याचा मॅनेजर व मोठ्या जॉईंट स्टॉक बँकेचा मॅनेजर यामधील फरक आहे.

आतां बेळगांवांत बँकांची वाढ पाहिलेस पहिल्या महायुद्धापासून ती सुरू होऊन दुसऱ्या महायुद्धामुळें बऱ्याच संस्था नांवारूपास चढल्या. सर्व हिंदुस्थानांतील बँकांमध्यें ठेवींची वाढ झालेली आहे, व त्यामध्यें बेळगांवच कसें अपवाद ठरेल ? पूर्वी सावकारांकडे अगर जमिनींत ठेवी पुरून ठेवल्या जात असत. बँका झाल्यानंतर त्यांचा ओघ बँकांकडे वळला व आजमितीस बेळगांवांत सर्व बँकांकडे मिळून जवळ जवळ तीन कोटी रुपये ठेवी म्हणून आहेत. परंतु याच ठेवी पन्नास वर्षांपूर्वी तीन लाख रुपयांच्या सुद्धां नव्हत्या ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. यामुळें आज बँका हें ठेवींचें माहेर-घर बनलें आहे व हे पैसे व्यापारधंदा, व जास्त उत्पादन वाढविण्यास कारणीभूत झाल्यानें राष्ट्र पुनर्घटणेच्या कार्यास त्याचा फार उपयोग होत आहे.

आजहि आमचेकडे बँकिंगची वाढ पाहिजे तेवढी झालेली नाहीं. सर्वसाधारणपणें पुढारलेल्या राष्ट्रांत सरकारनें काढलेल्या व लोकांच्या हातांत असलेल्या नोटा याचें पांचपट रकम बँकांमध्यें ठेवी म्हणून असतात. कोणाचेहि खिशांत व घरांत रकम पडून नसते व एकमेकांचे व्यवहार खात्यावर चेक देऊन मिटविले जातात. म्हणजे एकाचें देणें हें दुसऱ्याची ठेव होऊन बँकेमध्यें येते. घरांत व खिशांत पडून राहिलेला सर्व पैसा बँकांत एकत्रित होत असल्यानें तो पैसा राष्ट्र उभारणेच्या कामीं म्हणजे उत्पादन वाढविण्यास व गरजू कारखानदारांस उपयोगी पडतो, व अशा रीतीनें आर्थिक मदत म्हणजे जास्त उत्पादन, व जास्त उत्पादन म्हणजे जास्त लोकांना काम, असें हें समीकरण आहे.

आमच्याकडे बँकिंग क्षेत्रास किती वाढ आहे हें जाणून घेण्याचें असल्यास आज रिझर्व्ह बँकेनें काढलेल्या व लोकांचे हातांत असलेल्या जवळ जवळ सोळाशें कोटी रुपयांच्या नोटा व सर्व बँकांमध्यें ठेवीच्या रूपांत फक्त तेराशें कोटी रुपये आहेत व पाश्चात्य राष्ट्रांत अशा परिस्थितींत बँकांमध्यें आठ हजार कोटी रुपयांच्या ठेवी झाल्या असत्या व आपल्याकडे तर फक्त १३०० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. ह्यावरून अजून आपलें बँकिंग किती मागासलेलें आहे व अजून त्यामध्यें वाढ होण्यास किती वाव आहे हें दिसून येईल.

सरसकट बँकिंगची वाढ होण्यास आणखी एका बाबतींत आम्हीं मागें आहोंत. अमेरिकेंत कोणत्याहि बँकेंत पैसा ठेवला असतां सरकारी कंपलसरी डिपॉझिट इन्शुरन्स स्कीममुळें व त्याचे प्रिमियम भरल्यानें कोणतीहि बँक बंद झाली तरी ठेवीदारांचें नुकसान होत नाहीं. सर्व ठेवींचे पैसे त्यांना इन्शुरन्स कंपनीकडून ताबडतोब मिळूं शकतात. त्यामुळें तिकडे कोणाहि मनुष्याचा बँकांवर विश्वास असतो व त्यामुळें तिकडे सरसकट बँकांचा उपयोग केला जातो व त्यांचा घरांत व खिशांत पडून राहणारा पैसा राष्ट्रउभारणीच्या कार्यास उपयोगी पडतो. आज

आर्थिक क्षेत्रांत अमेरिका फार पुढें गेली आहे याचें हें एक बलवत्तर कारण आहे. तशी डिपॉझिट इन्शुरन्स स्कीम हिंदुस्थानांत आपल्या सरकारनें कां सुरू करूं नये ?

आजमितीस आपल्या हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीच्या लोकांना रोजगार देणारा धंदा म्हणजे शेतकी व त्यांना दररोज आर्थिक मदत करणारा म्हणजे आमच्या खेड्यांतील सावकारच होय. आजहि आपणांकडे लोकांना कर्जाऊ रक्कमा देण्यास बँका अगर को-ऑपरेटिव्ह संस्था यांचा हिस्सा फक्त शेंकडा ३% आहे. बाकी सर्व व्यवहार खाजगी सावकाराकडूनच होत आहे ही पद्धत बंद करून को-ऑपरेटिव्ह सोसायटीजकडून शेतकऱ्यांना मदत व्हावी असा सरकारी प्रयत्न आहे व लोकांचा पाठिंबा मिळाल्यास हा प्रयत्न खात्रीनें यशस्वी होईल असें वाटतें. सरकारी धोरण व पाठिंबा पाहिल्यास परस्पर सहकारी संस्थेकडे सरकारचा ओढा जास्त असल्यानें व सामान्य माणसांचें हित हें ह्या सहकारी चळवळीचा मूलभूत पाया असल्यानें या चळवळीचा उत्कर्ष होईल हें निश्चित.

याप्रमाणें बँकिंग क्षेत्रामध्यें ( जॉईंट स्टॉक व को-ऑपरेटिव्ह-मध्यें ) आमचा बेळगांव तसूभरहि मुळींच मागें नाहीं. बेळगांव म्हणजे महाराष्ट्रीय व कर्नाटकी संस्कृतीचा सुंदर मिलाफ आहे. यामुळें दोघांमध्यें चांगले व वाईट नमुने इकडे पहावयास मिळतात, तरी हंसक्षीर न्यायानें चांगले ते गुण कोणाकडूनहि घेऊन आपला उत्कर्ष मनुष्यानें साधून घेतला पाहिजे. व्यक्तीचा उदय म्हणजेच समाजाचा उदय व समाजाचा उदय म्हणजेच राष्ट्राचा उदय असें हें सूत्र आहे. हें सूत्र लोकांनीं जाणून घेतलें पाहिजे.

# सहकारी बँकांविषयीं आंकडे ( १९५६ : हजारांचे आंकडे )

## महाराष्ट्रांतील सेंट्रल बँका

| बँक | कचेऱ्यांची संख्या | वसूल | रिझर्व्हज् | ठेवी | कर्जें | एकूण देणीं | नफा अगर तोटा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ पू. खानदेश | ३५ | २,३८५ | २,४८३ | २६,३८८ | १५,४३७ | ३२,७१९ | ३०६ |
| २ नाशिक | ७ | ४३४ | ४ | ३,४२२ | २,५९६ | ३,९४७ | – १३ |
| ३ पुणें | १८ | १,०६९ | ८६३ | २१,०७३ | ११,७१५ | २३,८६३ | १६० |
| ४ सोलापूर | १३ | ७९२ | ५९० | ८,५२७ | ३,७०४ | १०,१९५ | ३६ |
| ५ बार्शी | २ | १२२ | १४२ | १,७७८ | ९८९ | २,१०४ | १९ |
| ६ कोल्हापूर | ५ | ३५१ | ७७ | २,७६६ | २,३४२ | ३,५९२ | ३९ |
| ७ उ. सातारा | ६ | ४५५ | ८० | ५,५३० | ३,५८२ | ६,१६० | ३५ |
| ८ द. सातारा | ८ | ३७८ | १९४ | ४,३२८ | ३,११६ | ४,९९७ | ३१ |
| ९ लक्ष्मी सेंट्रल | १ | ११६ | २१५ | १,८२० | १,०८३ | २,३१६ | २७ |
| १० वाडा को. बँ. युनियन | १ | ७५ | २१ | २४९ | २३१ | ३५६ | १ |
| एकूण | | ६,१७७ | ४,६६९ | ७५,८८१ | ४४,७९५ | ९०,२४९ | + ६२१ |
| **महाराष्ट्रांतील अर्बन बँका** | | | | | | | |
| एकूण | ६४ | ५,९५९ | ५,५८४ | ४५,५६९ | ३०,७३३ | ६३,४८६ | + ७३७ |
| **महाराष्ट्रांतील लँड मॉर्गेज बँका** | | | | | | | |
| एकूण | ७ | ४६७ | २०९ | ५,८२० | ६,०९२ | ७,२५२ | – १४५ |
| **मराठवाड्यांतील सहकारी बँका** | | | | | | | |
| एकूण | ९ | ७६४ | ९२२ | ३,९७० | ३,६३० | ६,१९० | + ६१ |
| **विदर्भांतील सहकारी बँका** | | | | | | | |
| एकूण | ३३ | ७,२४५ | ५,६७५ | ७६,५१७ | ६५,०६३ | ९१,१९५ | + १,२११ |

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.